# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/09/2023 (गुरूवार) दुपार

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयाची अवैध धंदयाविरूद्ध विशेष मोहीम

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी आगामी पोळा व गणेशोत्सव सणादरम्यान अवैद्य दारूविरूद्ध विशेष मोहीम सुरू केलेली असुन सदरची मोहीम दिनांक ०६/०९/२०२३ पासुन सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीमेदरम्यान आजपावेतो ०८ दिवसात नागपूर ग्रामीण जिल्हयात १६३ आरोपीतांवर कार्यवाही करण्यात आलेली असुन जवळपास एकुण ७१७८६०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची मोहीम अशीच गणेश विसर्जन पर्यंत सुरू ठेवण्यात येणार असुन पोळा व गणपती दरम्यान गुन्हेगारांवर विविध कलमान्वये प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही सुद्धा करणार असल्याचे तसेच अवैध धंदयाचे समुळ नष्ट करण्याचे पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी सांगितले.

## चोरी

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा खंडाळा खुर्द शिवार येथे दिनांक १३/०९/२०२३ चे १४. ३० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— साहेबराव मानिकराव बेलखेडे, वय ६० वर्ष, रा. खंडाळा काटोल याने आपले स्वत:चे शेतात जंगली जनावरे पळुण जाणे करीता मागिल २ वर्षापासुन ५५००/— रू. कींमतीची सोलर कंपनीची बॅटरी लावली होती. फिर्यादी हे घरी हजर असताना त्याचे नातेवाईक संजय बेलखोडे यांनी फोन करून सांगितले की शेतात लावलेले सोलर बॅटरी ही गावात राहणारे **आरोपी नामे— १) रामलाल युवनाते व २) दिलीप उर्फ झाटया रमेश धुर्वे, वय ३२ वर्ष, दोन्ही रा. खंडाळा** यांनी चोरून नेली असुन फिर्यादीने स्वत: चोरून नेतांनी पाहीले आहे. फिर्यादी व त्याचा मुलगा शेतात गेला असता बॅटरी दिसली नाही सदर दोन्ही आरोपीने बॅटरी चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे दोन्ही आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्रमांक ०२) याला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पवन वाघमारे मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर